Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
मुंबई पोलीस

पुण्यश्लोक 300

## अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - २१ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – २३/०२/२०२६

### कायमस्वरूपी अधिसूचना / आदेश

अधिसूचना क्रमांक - ६०५ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – २३/०२/२०२६

**ज्या अर्थी,** समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीमधील आकुर्ली रोड हा अरुंद रस्ता असून त्यावर अतिशय मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे. गर्दीच्या वेळेस सदर मार्गावर अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

**आणि ज्या अर्थी,** सदर मार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी व जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आकुर्ली रोडवरील संत ज्ञानेश्वर चौक ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत सकाळी ०८.०० वाजेपासून ते रात्री २१.०० वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशास व वाहतुकीस बंदी घालणे आवश्यक आहे, असे माझे मत झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. प्रियंका नारनवरे, भा.पो.से, अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई,** मला मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ११५, मोटार वाहन नियम, १९८९ नियम ५९ तसेच शासन निर्णय क्र. MVA ०५८९/CR-१०६१/TR-२ दि. १९/०५/१९८९, MGG IV-A दि. २०/०९/१९९० आणि MVA ००१९६/८७१/CR-३७/CR-२ दि. २७/०९/१९९६, MGG I-V-A Ex-P ३०७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार खालीलप्रमाणे वाहतूक निर्बंध लागू करीत आहे :—

**आदेश**

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीमधील **आकुर्ली रोडवरील संत ज्ञानेश्वर चौक ते पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंत सकाळी ०८.०० वाजेपासून ते रात्री २१.०० वाजेपर्यंत** खालील अपवाद वगळता सर्व प्रकारच्या **अवजड वाहनांच्या प्रवेशास व वाहतुकीस बंदी** राहील.

**निर्बंधांतून वगळण्यात येणारी वाहने**

रुग्णवाहिका व इतर आपत्कालीन वैद्यकीय सेवा वाहने, अग्निशमन दलाची वाहने, पोलीस विभागाची वाहने, महानगरपालिका तसेच वीज, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, गॅस इत्यादी अत्यावश्यक सार्वजनिक सेवा वाहने, दूध, भाजीपाला, बेकरी उत्पादने, अन्नधान्य, औषधे, पेट्रोलियम पदार्थ, एलपीजी सिलिंडर व इतर जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने व विशेष परिस्थितीत वाहतूक पोलीसांनी लेखी परवानगी दिलेली वाहने या वाहनांना सदर निर्बंध लागू राहणार नाहीत.

सदर वाहतूक निर्बंध आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ व त्याअंतर्गत नियमांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

ही अधिसूचना माझ्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दि. २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी मुंबई येथे जारी करण्यात येत आहे.

अपर पोलीस आयुक्त (वाहतूक)
सत्यमेव जयते
मुंबई

**(डॉ. प्रियंका नारनवरे) भा.पो.से.**
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number –022-24924734

Govt. of
Maharashtra
Home Department
**Mumbai Police**

**Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai**
Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

**Outward No. 29 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 23 /02/2026**

## PERMANENT NOTIFICATION / ORDER

**Notification No. 65 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 23 /02/2026**

**Whereas,** within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, Aakurli Road is a narrow road and carries a very heavy volume of traffic. During peak hours, it has been observed that heavy vehicles plying on the said road are causing severe traffic congestion.

**And whereas,** in order to maintain smooth flow of traffic on the said road and in the interest of public safety, it has become necessary to prohibit the entry and movement of heavy vehicles from Sant Dnyaneshwar Chowk to the Western Express Highway on Aakurli Road between 08.00 hours and 21.00 hours.

**Now, therefore, I, Dr. Priyanka Narnavare, IPS, Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai,** in exercise of the powers conferred upon me under Section 115 of the Motor Vehicles Act, 1988 read with Rule 59 of the Central Motor Vehicles Rules, 1989, and in accordance with Government Resolutions No. MVA 0589/CR-1061/TR-2 dated 19/05/1989, MGG IV-A dated 20/09/1990, and MVA 00196/871/CR-37/CR-2 dated 27/09/1996, MGG I-V-A Ex-P 307, hereby impose the following traffic restrictions:–

**Order**

On Aakurli Road, within the jurisdiction of Samata Nagar Traffic Division, **from Sant Dnyaneshwar Chowk to the Western Express Highway, entry and movement of all types of heavy vehicles shall remain prohibited between 08.00 hours and 21.00 hours,** except for the vehicles mentioned below.

**Vehicles exempted from the restriction**

Ambulances and other emergency medical service vehicles, fire brigade vehicles, police vehicles, vehicles of the Municipal Corporation and vehicles engaged in essential public services such as electricity, water supply, drainage and gas; vehicles transporting milk, vegetables, bakery products, food grains, medicines, petroleum products, LPG cylinders and other essential commodities; and vehicles permitted in writing by the Traffic Police under special circumstances shall be exempted from the above restrictions.

Drivers violating the said traffic restriction order shall be liable for legal action under the provisions of the Motor Vehicles Act, 1988 and the rules made thereunder.

This notification is issued under my seal and signature at Mumbai on this 23 day of February, 2026.

Addl Commissioner of Police
Mumbai

**(Dr. Priyanka Narnavare), IPS**
Additional Commissioner of Police, Traffic
Mumbai City

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२४९२४७३४

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
**मुंबई पोलीस**

## अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

वाहतूक पोलीस मुख्यालय, ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

जा. क्र. - २९ /अपोआ/वाहतूक/वा./कायमस्वरूपी अधिसूचना/२६, दिनांक – २३ /०२/२०२६

### :: वार्तापत्र ::

### आकुर्ली मार्गावरील अवजड वाहनांच्या वाहतुकीसंदर्भात निर्बंध

समता नगर वाहतूक विभागाच्या हद्दीमधील **आकुर्ली रोड** हा अरुंद रस्ता असून त्या मार्गावर अतिशय मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे. गर्दीच्या वेळेस अवजड वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

वाहतुकीचे सुरळीत नियोजन व जनतेची सुरक्षितता लक्षात घेऊन **आकुर्ली रोडवरील संत ज्ञानेश्वर चौक ते पश्चिम द्रुतगती महामार्ग** या दरम्यान **सकाळी ०८.०० ते रात्री २१.०० वाजेपर्यंत** सर्व प्रकारच्या अवजड वाहनांच्या प्रवेशास व वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे.

रुग्णवाहिका, अग्निशमन दल, पोलीस, महानगरपालिका तसेच वीज, पाणी, गॅस, मलनिस्सारण यांसारख्या अत्यावश्यक सेवा वाहने, तसेच दूध, भाजीपाला, औषधे, अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू वाहतूक करणाऱ्या वाहनांना या निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी वाहतूक निर्बंधांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**(डॉ. प्रियंका नारनवरे) भा.पो.से.**
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक
मुंबई शहर

अपर पोलीस आयुक्त (वाहतूक)
सत्यमेव जयते
मुंबई

Email – addlcp.traffic@mahapolice.gov.in
Phone Number – 022-24924734

Govt. of Maharashtra
Home Department
Mumbai Police

**Office of the Additional Commissioner of Police, Traffic, Mumbai**

Traffic Police Headquarters, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai - 400030

Outward No. 29 /TRF/Addl CP./R/Permanent Notification/2026, Dated: 23 /02/2026

## :: PRESS NOTE ::

### Restriction on Movement of Heavy Vehicles on Aakurli Road

Aakurli Road, within the jurisdiction of the Samata Nagar Traffic Division, is a narrow road carrying a very heavy volume of traffic. During peak hours, heavy vehicles have been causing severe traffic congestion on this stretch.

In order to ensure smooth traffic management and public safety, **entry and movement of all types of heavy vehicles have been prohibited between 08.00 hrs and 21.00 hrs on the stretch from Sant Dnyaneshwar Chowk to the Western Express Highway on Aakurli Road.**

Ambulances, fire brigade, police, municipal and other essential service vehicles such as electricity, water, gas and drainage services, as well as vehicles transporting milk, vegetables, medicines, food grains and other essential commodities, are exempted from the restriction.

Vehicles violating the said order shall be liable for action under the provisions of the Motor Vehicles Act, 1988. Citizens are requested to comply with the traffic restrictions and extend their cooperation.

Addl Commissioner of Police
Mumbai

**(Dr. Priyanka Narnavare), IPS**
Additional Commissioner of Police, Traffic
Mumbai City